

| वर्ष - 7 I अंक - 130 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- गॉफने पटकावले विजेतेपद!
- करीनानं केला राष्ट्रगीताचा अपमान!
- मी गीता, उपनिषदे वाचलीत!
- आम्ही नाव नाही पंतप्रधान बदलणार!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 12 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पवना थेट जलवाहिनीचे ‘ग्रहण सुटले’!

## तब्बल 12 वर्षांनंतर प्रकल्पाला चालना : पिंपरी-चिंचवडकरांचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सुटला!







पिंपरी- चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या याचा विचार करता आगामी ५० वर्षांचा विचार करुन नवीन जलस्त्रोत निर्माण करण्याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे आंद्रा व भामा आसखेड प्रकल्पातून २६७ एमएलडी पाणी उपलब्ध होण्यास चालना मिळाली. आता पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाचे कामही प्रशासनाने लवकरात लवकर सुरू करावे आणि पिंपरी- चिंचवडकरांचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा, अशी अपेक्षा आहे. तसेच, सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा विचार करून राज्यातील महायुती सरकारने हा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतल्याबद्दल पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने राज्य सरकारचे आभार व्यक्त करतो.

**– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा**

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराचा पाणी पुरवठा आगामी ५० वर्षांच्या नियोजनाप्रमाणे सक्षम होण्यासाठी हाती घेतलेला पवना थेट जलवाहिनी प्रकल्पाला लागलेले ‘ग्रहण’ अखेर १२ वर्षांनंतर सुटले आहे. राज्य सरकारने या प्रकल्पाचा ‘जैसे थे’ आदेश रद्द केल्यामुळे प्रकल्पाला चालना मिळाली असून, पिंपरी-चिंचवडकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.**

‘पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाला २००८ मध्ये मंजुरी दिली. या प्रकल्पाचे काम सुरू झाले. त्यावेळी प्रकल्पाच्या विरोधात स्थानिक शेतकऱ्यांनी पुणे-मुंबई एक्स्प्रेस वे रोखून धरला. आंदोलन उग्र झाल्यामुळे पोलिसांनी लाठीचार्ज आणि गोळीबार केला. यामध्ये दि. ९ ऑगस्ट २०११ रोजी तीन शेतकऱ्यांचा नाहक बळी गेला. त्यानंतर पिंपरी-चिंचवड शहराला ४२ किलोमीटर दूरवरील मावळ तालुक्याच्या पवना धरणातून थेट पाणी आणणाऱ्या या योजनेच्या कामाला प्रथम पुणे जिल्हाधिकारी आणि नंतर राज्य सरकारनेही ‘जैसे थे’ म्हणजेच स्थगिती दिली होती.

दरम्यान, महायुती सरकारने 'जैसे थे'चा हा आदेश आता उठल्याने हे काम पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे गेल्या पावणे चार वर्षांपासून उद्योगनगरीत सुरू असलेला दिवसाआड पाणीपुरवठा बंद होऊन रहिवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

भारतीय जनता पार्टीचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांनी 2014 पासून सुरू केलेला पाठपुरावा अखेर यशस्वी ठरला. जुलै-२०२३ मध्ये झालेल्या विधानसभा अधिवेशनाच्या निमित्ताने आमदार लांडगे यांनी सभागृहात हा मुद्दा आक्रमकपणे उपस्थित केला होता. त्यामुळे राज्याच्या नगरविकास विभागाने हा ‘जैसे थे’ आदेश रद्द करण्याची घोषणा केली आहे. तसे पत्र पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाला पाठवले आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील पाणी प्रश्न निकालात काढण्यासाठी पवना थेट पाईपलाईन प्रकल्पावरील स्थगिती महायुती सरकारने उठवली. या प्रकल्पासाठी लोकनेते आमदार स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांनी राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. त्यांनी केलेल्या प्रयत्नांना आज यश मिळाले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पवना धरणातून सेक्टर क्र. २३ निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी आणण्यासाठी “थेट पाईपलाईन” योजनेचे काम पुन्हा सुरू होणार आहे. त्यामुळे शहरातील आगामी ५० वर्षांचा पाणीपुरवठा सुरळीत होईल, असा विश्वास आहे. या प्रकल्पासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आहे. या महत्त्वाकांक्षी निर्णयाबद्दल महायुती सरकारचे मन:पूर्वक धन्यवाद देतो.

**– शंकर जगताप, शहाध्यक्ष, भाजपा**



पवना बंद जलवाहिनी योजनेवरील स्थगिती उठविल्यानंतर आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह म्हणाले, “पिंपरी चिंचवड सारख्या झपाट्याने वाढणाऱ्या शहरात स्वच्छ आणि सतत पाणी पुरवठा करणे ही काळाची गरज आहे. पवना बंद जलवाहिनी योजनेवरील स्थगिती १२ वर्षांनंतर उठली हे महापालिकेसाठी एक निर्णायक वळण आहे. नागरिकांसाठी ही आनंदाची बाब असून शहराचा विकसनशील शाश्वत मार्ग मोकळा करण्यात आणि पाणीपुरवठ्याच्या समस्या दूर करण्यास यामुळे मदत होईल, तसेच महापालिका विविध प्रकल्प पूर्ण करण्याच्या दिशेने निर्णायक पाऊले उचलण्यास प्रयत्न करेल.”

**- शेखर सिंह, आयुक्त.**



पवना धरणातून थेट पाईपलाईन द्वारे पाणी शहरात आणले जाणार आहे. यापूर्वी पवना थेट पाईपलाईन प्रकल्पावर स्थगिती होती. यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार पिंपरी चिंचवड शहरात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी याबाबत समविचारी पक्ष एकत्रित असल्याने तातडीने निर्णय करण्याची मागणी केली. त्याला यश आल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व देवेंद्र फडणवीस यांच्या सामूहिक प्रयत्नामुळे पवना धरणातून थेट पाईपलाईन द्वारे पाणी मिळणार आहे. शहराची लोकसंख्या पाहता पाणी प्रश्न मिटणार आहे. या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करतो.

**– नाना काटे, माजी विरोधी पक्षनेता.**



पिंपरी-चिंचवड शहरवासियांच्या हिताचा उपमुख्यमंत्री अजितदादा व राष्ट्रवादीने नेहमीच विचार केला आहे. शहराची पुढील 25 वर्षांची पाण्याची गरज या निर्णयामुळे पूर्ण होणार आहे. महापालिका पातळीवर या प्रकल्पाबाबत आम्ही पाठपुरावा करून हा प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. . राज्यातील आणि महापालिकेतील सत्ता गेल्यानंतर हा प्रकल्प बासणातच गेल्याचे मानले जात होते. मात्र, अवघ्या काही दिवसांपूर्वीच सत्तेत सहभागी झालेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या प्रकल्पासाठी पुन्हा पुढाकार घेऊन नगरविकास विभागाकडे पाठपुरावा करण्यास सुरुवात केली होती.शहरहिताच्या दृष्टीने अजितदादांच्या माध्यमातून इतरही प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.

**–अजित गव्हाणे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी**

## माजी आमदार बाळा भेगडेंचा विरोध...



मावळातील पवना धरणातून बंद जलवाहिनीतून पिंपरी-चिंचवडसाठी पाणी आणण्याच्या तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या ड्रीम प्रोजेक्टवर २०११ ला त्यांच्याच राज्य सरकारने बंदी आणली. भोसरीचे आमदार महेश लांडगेंच्या प्रयत्नामुळे नुकतीच ती बंदी उठल्याने तो पुन्हा सुरू होण्याच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. मात्र, माजी राज्यमंत्री आणि मावळचे भाजपचेच माजी आमदार बाळा भेगडे यांनी या प्रकल्पाला विरोध कायम असल्याचा दावा केला आहे. भेगडे व त्यांचा पक्ष भाजपसह (BJP) शिवसेना आणि आरपीआय या तीन राजकीय पक्षांसह भारतीय किसान संघाने बंदी उठली असली, तरी पुन्हा ही योजना सुरू करण्यास आज विरोध केला. त्यांच्या आंदोलनामुळेच या योजनेवर २०११ ला बंदी आली होती. ती नुकतीच उठली. तरीही वरील पक्ष आणि संघटनेसह स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध कायम राहिल्याने या प्रकल्पाच्या मार्गातील अडथळे कायम राहिले आहेत.

# मासळी बाजार सुरु करण्याला विरोध!

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयावर मोर्चा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मार्केट यार्ड परिसरातील शिवनेरी रस्त्यावर असलेल्या वाहनतळाच्या जागेवर पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने मासळी बाजार सुरू करण्याचा निर्णय घेतला असून या निर्णयाच्या निषेधार्थ स्थानिक रहिवाशांनी बाजार समितीच्या कार्यालयावर सोमवारी मूक मोर्चा काढला.**

मोर्चात स्थानिक रहिवाशांसह मार्केट यार्ड भागातील व्यापारी, विविध राजकीय पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते मार्केट यार्ड भागातील उत्सव हॉटेलपासून मोर्चाचा प्रारंभ झाला. मोर्चात स्थानिक रहिवाशांसह विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. बाजार समितीच्या निर्णयाच्या निषेधार्थ मोठ्या संख्येने स्थानिक रहिवासी सहभागी झाले होते. मोर्चाची सांगता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालय येथे करण्यात आली. बाजार समितीचे सचिव डॉ. राजाराम धोंडकर यांना निवेदन देण्यात आले.मार्केट यार्ड भागात मोठ्या संख्येने जैन बांधव राहायला आहेत.

बाजार समितीच्या मोकळ्या जागेत वाहनतळ आहे. वाहनतळाच्या जागेवर मासळी बाजार सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मासळी बाजार सुरू झाल्यास या भागात अस्वच्छता निर्माण होईल, तसेच नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होईल, असे मोर्चात सहभागी झालेल्या रहिवाशांनी सांगितले. आमदार माधुरी मिसाळ, काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, प्रदेश सरचिटणीस ॲड. अभय छाजेड, माजी सभागृह नेता श्रीनाथ भिमाले, बाळासाहेब ओसवाल, वालचंद संचेती, विजयकांत कोठारी, अचल जैन, विजय भंडारी, फत्तेचंद रांका, ललित जैन, प्रवीण चोरबेले, राजेंद्र बाठिया, राजेश शहा, राजेंद्र गुगळे, रायकुमार नहार, नितीन जैन, विलास भुजबळ, कुणाल ओस्तवाल, नितीन कदम आदी या मोर्चात सहभागी झाले होते. बाजार समितीने मोकळ्या जागेत मासळी बाजार सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. आठ दिवसांत निर्णय रद्द न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी दिला. अभय छाजेड, प्रवीण चोरबेले यांनी निर्णय मागे घेण्याची मागणी केली.



> बाजार समितीच्या संचालक मंडळाने मासळी बाजार सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत आठ दिवसात संचालक मंडळाची बैठक आयोजित करण्यात येणार आहे. बैठकीत संबंधित विषय संचालक मंडळासमोर ठेवण्यात येणार आहे.
> – **डॉ. राजाराम धोंडकर,** सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती

### निर्णय रद्द करण्याचे फडणवीस यांचे आदेश

» मार्केट यार्डात मासळी बाजार सुरु करण्याचा निर्णय रद्द करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिले. बाजार समितीच्या संचालक मंडळांनी मंजूर केलेला प्रस्ताव रद्द करण्याची सूचना फडणवीस यांनी केली, अशी माहिती आमदार माधुरी मिसाळ यांनी दिली. या भागात दाट वस्ती आहे. मासळी बाजारामुळे आरोग्याची समस्या निर्माण होऊ शकते. नागरिकांच्या भावना मी फडणवीस यांच्यापर्यंत पोहचविल्या. फडणवीस यांनी पणन मंत्री अब्दुल सत्तार यांना मासळी बाजाराचा निर्णय रद्द करण्याच्या सूचना दिल्या आहेत, असे मिसाळ यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांचे आकलन ठरणार महत्वाचे!

## बारावीच्या प्रश्नपत्रिकांच्या स्वरुपात बदल

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरुपात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. त्यात संकल्पना-सक्षमतेवर आधारित प्रश्न, बहुपर्यायी स्वरुपाच्या प्रश्नांचा प्रश्नपत्रिकेत समावेश करण्यात आला असून, विद्यार्थ्यांच्या सरावासाठी प्रश्नपत्रिकांचे प्रारुप जाहीर करण्यात आले आहे.**

सीबीएसईच्या दहावी आणि बारावीची परीक्षा १५ फेब्रुवारी ते १० एप्रिल या कालावधीत होणार आहे. त्या अनुषंगाने आता परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांमध्ये होणाऱ्या बदलांची माहिती सीबीएसईने दिली. आगामी परीक्षेसाठी प्रश्नपत्रिकतेचे स्वरुप बदलण्यात आले आहे. आता प्रश्नपत्रिकेत अधिक विश्लेषणात्मक, संकल्पनात्मक स्पष्टता विशद करणारे, तसेच विद्यार्थ्यांचे आकलन तपासणाऱ्या बहुपर्यायी स्वरुपाचे प्रश्न विचारले जातील.

त्यात ५० टक्के प्रश्न सक्षमतेवर आधारित म्हणजे विश्लेषणात्मक प्रकारचे असतील. तर ४५ टक्के बहुपर्यायी प्रश्न एक दोन गुणांसाठीचे असतील. बदललेल्या स्वरुपाची विद्यार्थी, शिक्षक, पालकांना माहिती होण्यासाठी विविध विषयांच्या प्रश्नपत्रिकांचे प्रारुप HTTPS://CBSEACADEMIC.NIC.IN/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरुपात महत्वपूर्ण बदल केले आहेत. त्यात संकल्पना-सक्षमतेवर आधारित प्रश्न, बहुपर्यायी स्वरुपाच्या प्रश्नांचा प्रश्नपत्रिकेत समावेश करण्यात आला असून, विद्यार्थ्यांच्या सरावासाठी प्रश्नपत्रिकांचे प्रारुप जाहीर करण्यात आले आहे.

प्रश्नपत्रिकांच्या बदललेल्या स्वरुपाविषयी ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे प्राचार्य डॉ. मिलिंद नाईक म्हणाले, की पूर्वीच्या प्रश्नपत्रिकांमध्ये विद्यार्थ्यांचे पाठांतर किंवा स्मरणशक्ती महत्वाची होती.

मात्र नव्या प्रश्नपत्रिकांमध्ये विद्यार्थ्यांचे आकलन किंवा विद्यार्थ्यांना संकल्पना कळणे महत्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक समजून घेऊन अभ्यास करावा लागेल.



### एक दोन गुणांसाठी बहुपर्यायी प्रश्न

» सीबीएसईच्या दहावी आणि बारावीची परीक्षा १५ फेब्रुवारी ते १० एप्रिल या कालावधीत होणार आहे. त्या अनुषंगाने आता परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांमध्ये होणाऱ्या बदलांची माहिती सीबीएसईने दिली. आगामी परीक्षेसाठी प्रश्नपत्रिकतेचे स्वरुप बदलण्यात आले आहे. आता प्रश्नपत्रिकेत अधिक विश्लेषणात्मक, संकल्पनात्मक स्पष्टता विशद करणारे, तसेच विद्यार्थ्यांचे आकलन तपासणाऱ्या बहुपर्यायी स्वरुपाचे प्रश्न विचारले जातील. त्यात ५० टक्के प्रश्न सक्षमतेवर आधारित म्हणजे विश्लेषणात्मक प्रकारचे असतील. तर ४५ टक्के बहुपर्यायी प्रश्न एक दोन गुणांसाठीचे असतील.

# वाहतूक नियमन सुरळीत करण्यावर भर द्या: काँग्रेस

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे शहरातील वाहतूक कोंडी पुणेकरांसाठी प्रचंड त्रासदायक आहे. उत्सव काळात होणारी गर्दी आणि त्याकडे पोलिसांचा कानाडोळा यामुळे शहराच्या मध्यवर्ती भागासह सर्वत्र वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. पुणे शहरातील ही वाहतूक कोंडी त्वरित दूर करण्यासाठी पोलीस आयुक्तांनी लक्ष घालावे, अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली. पुण्यातील वाहतूक कोंडीच्या संदर्भात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष मोहन जोशी यांच्या नेतृत्वाखाली विविध मागण्यांचे निवेदन पोलीस आयुक्त रितेश कुमार, पोलीस सहआयुक्त संदीप कर्णिक व वाहतूक शाखेचे उपायुक्त विजयकुमार मगर यांना देण्यात आले. यावेळी आमदार रवींद्र धंगेकर, माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे, नुरुद्दीन सोमजी, जया किराड, प्रशांत सुरसे, प्रथमेश आबनावे, चेतन अग्रवाल आदी उपस्थित होते. मोहन जोशी यांनी दिलेल्या निवेदनात, यासंदर्भात त्वरित आढावा बैठक घेऊन पोलिसांनी शहरातील विविध ठिकाणी कोंडी होण्याच्या वेळी वाहतूक नियमनाची जबाबदारी वाहतूक शाखेतील सर्व अधिकाऱ्यांनी घ्यावी. यासाठी राज्य राखीव पोलीस दल (एसआरपीएफ), पोलीस आयुक्तालयातील ज्यादा कुमक, जवळील पोलीस स्टेशनचे कर्मचारी, महानगरपालिकेचे ट्राफिक वॉर्डन यांची कुमक मागवून घ्यावी. स्मार्ट सिटीतील ट्राफिक सिग्नल त्वरित कार्यान्वित करावेत. गणेशोत्सव काळात सामाजिक संस्थांची मदत घ्यावी. कलावंतांच्या सहकार्याने वाहतूक कोंडी फोडण्यासाठी जनजागृतीपर व्हिडीओ करावेत. तसेच शहरातील जड वाहतुकीच्या संदर्भातल्या नियमांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. मोहन जोशी म्हणाले, पुणे शहरातील वाहतूक कोंडी हा कळीचा मुद्दा आहे. शहरामध्ये वाहतूक नियमन कोलमडलेले आहे. आज पुणेकर नागरिकांना वेठीला धरले जात आहे. ही वाहतूक कोंडी दूर करण्यावर आणि वाहतूक नियमन सुरळीत करण्यावर पोलिसांनी भर द्यावा. शहरातील वाहतूक कोंडी दूर न झाल्यास पक्षाच्या वतीने तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल.


# पुनवळे विकासापासून 'वंचित'!

## स्थानिक नागरिकांचा प्रश्न : ना उद्यान... ना हॉस्पिटल... मग, कचरा डेपोच का?

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुनवळेतील कचरा डेपो उभारण्याचा प्रयत्न पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन करीत आहे. त्यासाठी भविष्यात समाविष्ट होणाऱ्या गावांचा दाखला दिला जात आहे. मात्र, जांबे, मारुंजी आदी गावांनी त्यांच्या हद्दीलगत कचरा डपो उभारण्याऐवजी त्या जागेवर सार्वजनिक वापरासाठी एखादा प्रकल्प उभारावा, अशी मागणी केली आहे. कारण, महापालिकेत समाविष्ट झाल्यापासून पुनवळेला काय मिळाले? ना उद्यान... ना हॉस्पिटल.... विकसित केले. मग, कचरा डेपोसाठी प्रशासन एव्हढे आग्रही का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**





ग्रामपंचायत मारुंजी

निर्मलग्राम ग्रामपंचायत जांबे

विशेष म्हणजे, दि. ११ सप्टेंबर १९९७ म्हणजे आजपासून बरोबर २६ वर्षांपूर्वी पुनवळे गावाचा समोवश पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत झाला. मात्र, आजही पुनवळे पायाभूत सोयी-सुविधांपासून वंचित आहे. नव्याने विकसित झालेल्या भागात अद्याप स्ट्रॉमवॉटर, ड्रेनेज लाईन महापालिका प्रशासनाला उपलब्ध करुन देणे जमलेले नाही. मात्र, कचरा डेपो विकसित करण्यासाठी प्रशासन प्राधान्य देत असल्यामुळे स्थानिक नागरिकांमधून प्रचंड नाराजीचा सूर आहे.

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना ग्रामपंचायत जांबे आणि ग्रामपंचायत मारुंजी यांनी गावकऱ्यांच्या वतीने निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पुनवळे आणि परिसरात लोकसंख्या आणि नागरिकरण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. मोठ्या गृहनिर्माण सोसायटी उभा राहिलेल्या आहेत. मात्र, या भागात शासकीय हॉस्पिटल, स्विमिंग टँक, गार्डन, खेळाचे मैदान अथवा पर्यटनाच्या दृष्टीने कोणताही सार्वजनिक प्रकल्प विकसित केलेला नाही. कचरा डेपो उभारल्यास या भागातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. तसेच, डेपोसाठी मोठ्याप्रमाणात वृक्षतोड करुन प्रदुषण आणि पर्यावरणाची हानी होणार आहे. जांबे आणि पुनवळे गावची शिव एकच असून, जांबे गावातही मोठ्याप्रमाणात लोकवस्ती वाढलेली आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने लोकवस्ती विरळ असलेल्या ठिकाणी किंवा शहराबाहेर कचरा डेपो विकसित करावा. ज्यामुळे स्थानिक नागरिक, सोसायटीधारकांना त्रास होणार नाही.

### चंद्रपूरमध्ये वृक्षारोपण, कचरा डेपो पुनवळेत?

» पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन वृक्षाच्छादित पुनावळेतील वनविभागाची जागा ताब्यात घेणार आहे. त्या बदल्यात वन विभागाला चंद्रपूर येथील जागा देण्यात येणार असून, त्या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार आहे. पण, चंद्रपूरमधील वृक्षारोपणाचा पुनावळे, जांबे, मारुंजी या भागातील नागरिकांना काय फायदा? असा प्रश्न आहे. पुनावळेत वन विभागाची २२.८ हेक्टर जागा महापालिका घेण्यासाठी आग्रही आहे. त्या बदल्यात मुळशीतील पिंपरी येथे वन विभागाला महापालिका पर्यायी जागा देणार होती. मात्र, या ठिकाणी मुरूम असल्याने वन विभागाने या जागेचा पर्याय नाकारला आहे. वृक्षाच्छादीत असलेला हा परिसर समाविष्ट गावांसाठी 'ऑक्सिजन पार्क' ठरणार आहे. त्यामुळे राज्याच्या वन विभागाने वृक्षतोड आणि पर्यावरण संवर्धन याचा विचार करावा, अशी स्थानिक नागरिक, सोसायटीधारकांची मागणी आहे.

---

# राष्ट्रीय लोकअदालतीत ११२८ प्रकरणे निकाली!

## बार असोसिएशनचा पुढाकार : 4.95 कोटींचा महसूल जमा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड न्यायालय व पुणे जिल्हा विधी प्रधिकरण व पिंपरी चिंचवड अॅडव्होकेट बार असोशिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. ९) राष्ट्रीय लोकअदालतीत आयोजन करण्यात आले. यामध्ये ११२८ प्रकरणे निकाली निघाली असून ४.९५ कोटीचा महसूल जमा झाला आहे.**




. लोक न्यायालयात पिंपरी न्यायालयात विविध प्रकारचे २०४ खटले निकाली काढण्यात आले. त्यामध्ये २ कोटी ७० लाख ४४ हजार १४९ रुपये महसूल जमा झाला व आकुर्डी येथील न्यायालयात येथे ९२४ खटले निकाली काढण्यात आले. त्यामध्ये २ कोटी २५ लाख ४६ हजार ४६० रुपये महसूल जमा झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पिंपरी चिंचवड अॅडव्होकेट बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष राजेश पुणेकर यांनी भूषवले. कार्यक्रमाचे नियोजन पिंपरी चिंचवड अॅडव्होकेट्स् बार असोशिएशनचे अध्यक्ष अॅड. नारायण रसाळ, उपाध्यक्षा अॅड. जयश्री कुटे, सचिव अॅड. गणेश शिंदे यांनी केले. त्यावेळी महिला सचिव अॅड. प्रमिला गाडे, ऑडिटर अॅड. राजेश रणपिसे, सदस्य अॅड. स्वप्नील वाळुंज, अॅड. सौरभ जगताप, अॅड. प्रशांत बचुटे, अॅड. अक्षय केदार उपस्थित होते. अॅड. शोभा कड यांची प्रमुख उपस्थिती होती. पिंपरी न्यायालयाचे न्यायाधीश आर. एस. वानखेडे, आर. एम. गिरी यांचा सत्कार पिंपरी-चिंचवड अॅडव्होकेट बार असोसिएशनच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी बालाजी विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुश्री जोशी या देखील उपस्थित होत्या. पथनाट्यचे संयोजन अॅड. मंगेश खराबे यांनी केले. तसेच यावेळी एस एन बी पी विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. न्यायधीश वानखेडे यांनी मार्गदर्शन करतांना नागरीकांना लोकअदालत व त्याचे महत्व सांगितले. जास्तित जास्त नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमासाठी पिंपरी-चिंचवड अॅडव्होकेट बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष अॅड. सुदाम साने, अॅड. सतीश गोरडे, अॅड. सुनील कडूस्कर, सर्व सरकारी वकील तसेच पिंपरी बारचे बहुसंख्य वकील बंधू भगिनी, पक्षकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पिंपरी चिंचवड अॅडव्होकेट्स् बार असोसिएशनच्या महिला सचिव अॅड. प्रमिला गाडे यांनी केले. तर अॅड. प्रशांत बचुटे यांनी आभार मानले.

### स्किट प्लेच्या माध्यमातून जागृती...

» **लोकन्यायालय करिता पॅनल अॅडव्होकेट म्हणून काम अॅड. निलम जाधव व अॅड. अक्षय भालेराव तसेच आकुर्डी येथील न्यायालयात अॅड. सुषमा पाटील यांनी पाहिले. राष्ट्रीय लोक अदालत निमित्त बार असोसिएशन तर्फे बालाजी विधी महाविद्यालयाचे सानिका शेवाळे, देवयानी नाईक, सरिता वैद्या, श्रावणी शिंदे, वैष्णवी पाटील, नेहा अहिरवल, पायल बोधक, समर्थ शेळके, सिद्धार्थ लोखंडे, दिक्षा नांद्रे, चाणक्य वाडे, निखिल गिरी यांनी स्किट प्लेच्या माध्यमातून मध्यस्थी प्रक्रियेचे महत्त्व व जागृती पक्षकारांसमोर सादर केली.**

# शिंदे-फडणवीसांचे घूमजाव कशामुळे?




**गैरव्यवस्थापनामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या आणि 'नक्त मूल्य उणे' ठरल्याने राष्ट्रीय सहकार विकास निगमने (एनसीडीसी) कर्ज नाकारलेल्या राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या कर्जाला थकहमी देण्याचा निर्णय घेऊन महायुती सरकारने घूमजाव केले.**

गैरव्यवस्थापनामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या आणि 'नक्त मूल्य उणे' ठरल्याने राष्ट्रीय सहकार विकास निगमने (एनसीडीसी) कर्ज नाकारलेल्या राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या कर्जाला थकहमी देण्याचा निर्णय घेऊन महायुती सरकारने घूमजाव केले. कारण याच सरकारने हमीची रक्कम बुडीत निघत असल्याने आठ महिन्यांपूर्वी सहकारी साखर कारखान्यांच्या कर्जाला थकहमी द्यायची नाही, अशी भूमिका घेतली होती. पण सोयीच्या राजकारणापुढे आर्थिक शिस्त निकालात निघते. सहकारी साखर कारखाने वा अन्य सहकारी संस्था हा राष्ट्रवादीचा आवडता विषय.

अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीचे बंडखोर सरकारमध्ये सहभागी झाले आणि शिंदे-फडणवीस सरकारने आधी घेतलेल्या निर्णयांमध्ये बदल होऊ लागले. साखर कारखान्यांच्या कर्जाला सरकारी थकहमी हा राज्यातील मुळातच एक संवेदनशील मुद्दा. उसाच्या



लागवडीपासून ते साखरनिर्मिती हा राज्याच्या राजकारण आणि समाजकारणातील कायमच चर्चेचा विषय राहिला आहे. पाणी कमी म्हणून ऊस नको तर शेतकऱ्यांना पर्याय काय, याचे उत्तर कोणाकडेच नसते. देशातील साखर उद्योगाकडून सरकारला सुमारे १२ हजार कोटींपेक्षा अधिक उत्पन्न कररूपाने मिळते, यापैकी एकतृतीयांश वाटा महाराष्ट्राचा आहे.

म्हणजेच सुमारे पाच हजार कोटींच्या आसपास महसूल राज्यातील साखर उद्योगाकडून सरकारी तिजोरीत जमा होतो. महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी ५० टक्क्यांच्या आसपास लोकसंख्या कृषी वा कृषीवर आधारित उद्योगांवर अवलंबून, त्यातही पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्राच्या काही भागांत साखर उद्योगच मुख्य. सरकारी तिजोरीत कर जमा करणाऱ्या आणि शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या साखर उद्योगाला सरकारने मदत केली तर बिघडले कुठे, असा एक सर्वसाधारण सवाल यानिमित्ताने उपस्थित केला जातो. शेतकऱ्यांना मदत करण्यास कोणाचाच आक्षेप असण्याचे कारण नाही. पण सरकारी मदतीवर स्वतःच्या तुंबड्या भरणाऱ्या सहकारातील अपप्रवृत्तींना चाप लावावा लागणार आहे. शेतकऱ्यांच्या उसाला योग्य भाव मिळावा आणि त्यांची पिळवणूक होऊ नये या उद्देशाने सहकारी साखर कारखाने उभारण्यास १९८०च्या दशकात शासकीय पातळीवर प्रोत्साहन देण्यात आले. सहकारी साखर कारखाने उभारण्यास सरकारने भागभांडवल उपलब्ध करून दिले. कारखाने आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य व्हावेत तसेच आर्थिक गणित जुळावे या उद्देशाने सरकारने विविध सवलती दिल्या. याचाच भाग म्हणून सहकारी साखर कारखान्यांच्या कर्जाला राज्य सरकारने थकहमी देण्याची पद्धत रूढ केली.

कर्ज मिळावे यासाठी हमी देण्याचा सरकारचा उद्देश चांगला होता, पण त्याचा अनेक सहकारी साखर कारखानदारांनी गैरफायदा घेऊन कर्ज फेडलेच नाही. बँकांनी सरकारच्या मागे तगादा लावला. या बुडीत कर्जातच महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे दिवाळे वाजण्याची वेळ आली होती. संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक मंडळ नेमण्यात आले आणि तोट्यातील ही बँक कालांतराने फायद्यात आली, तोच राज्य सहकारी बँकेचे सुमारे दीड हजार कोटी विविध सहकारी संस्थाचालकांनी बुडविले. राज्य सरकारमध्ये धोरणसातत्याचा नेहमीच अभाव बघायला मिळतो. उदा. सरकार बदलल्यावर महानगरपालिका किंवा नगरपालिकांच्या निवडणुकांबाबत. एकसदस्यीय किंवा बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीने घ्यायच्या याचा निर्णय दर वेळी बदलला जातो. अशीच काहीशी गत सहकारी संस्थांच्या कर्जाच्या हमीबाबत बघायला मिळते. सरकारगणिक या हमीचे निर्णय बदलले जातात. पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस किंवा उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीत सहकारी साखर कारखान्यांच्या कर्जाच्या हमीबाबत सरकारने कठोर भूमिका घेतली होती. पण दबाव वाढल्यावर सरकारची भूमिका हमीबाबत लवचीक होते. राष्ट्रवादी काँग्रेसचा पायाच सहकारी चळवळीवर विसंबून. यामुळे सहकाराला झुकते माप देण्यावर या पक्षाच्या धुरीणांचा भर असतो.

## संपादकीय »

### अलिप्तांची अपरिहार्यता!

***'जी-२०' ठरावामुळे युक्रेन युद्ध थांबणार नाही आणि त्यातून निर्माण झालेल्या जागतिक समस्यांचे निराकरणही नजीक दिसत नाही, हे भारतीय नेतृत्वाने लक्षात घेतले..***

कोणत्याही आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोप प्रसंगी संयुक्त निवेदन प्रसृत केले जाते. नवी दिल्लीत भरलेल्या 'जी-२०' परिषदेच्या पहिल्याच दिवशी सांगतेचे संयुक्त निवेदन प्रकाशित केले गेले आणि हा सांगता ठराव किंवा जाहीरनामा सर्वमान्य असल्याची घोषणा यजमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. अमेरिका आणि त्याच्या गटातील अनेकांस रशियाचा उल्लेख हवा होता तर चीन आणि अन्यांस ते टाळावयाचे होते. या मुद्द्यावर आपण चीनच्या 'बाजूने' होतो. तेव्हा मधला मार्ग म्हणून निवेदनात 'युक्रेन युद्ध' असा उल्लेख झाला; पण त्यास कोण जबाबदार हे खुबीने टाळले गेले. ती तशी दाखवली जावी असा आग्रह आपणासह अन्य अर्धविकसित देशांनी धरला आणि कोणताही वादग्रस्त मुद्दा संयुक्त निवेदनात येणार नाही, याची खातरजमा करून हे निवेदन प्रसृत केले गेले.

**जी-२०' समूहाचे यजमानपद आता भारताकडून ब्राझीलकडे गेलेले आहे. कथित जनभागीदारीतून वर्षभर मिरवलेले अध्यक्षपद आता संपुष्टात आलेले आहे. नवी दिल्लीमध्ये 'जी-२०' समूहाची शिखर बैठक दोन दिवसांची होती. बैठकीच्या शेवटच्या दिवशी 'दिल्ली जाहीरनामा' प्रसृत केला जाईल असा अंदाज होता. ही बैठक अधिकृतपणे संपण्याआधीच भारताने स्वतःच्या मुत्सद्देगिरीबद्दल पाठ थोपटून घेतली.**

# 'जी-20'च्या लोकप्रियतेनंतर काय ?

भाजपमधील नेते पंतप्रधान नरेंद्र मोदींचा उल्लेख 'विश्वगुरू' असा करतात. या विश्वगुरूपणाचा उचित वापर आगामी लोकसभा निवडणुका, पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत केला जाईल. कर्नाटकमधील पराभवानंतर फक्त मोदींच्या भरवशावर राज्यांमधील निवडणुका जिंकता येणार नाहीत, याची जाणीव भाजपला झाली होती. तसे नसते तर मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याआधीच उमेदवारांची यादी जाहीर केली नसती. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडून अजित पवारांच्या कुबड्या घेण्याची गरज पडली नसती. पण आता मोदींच्या नेतृत्वावर भरवसा दाखवण्यासाठी 'जी-२०' समूहाची शिखर परिषद धावून आली आहे वा निदान भाजपला तसे वाटू शकते. सर्वसंमतीने दिल्ली जाहीरनामा स्वीकारले जाणे ही मोदींच्या आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीची कमाल असल्याचा प्रचार भाजप आगामी




निवडणुकांत करू शकेल. देशांतर्गत राजकारणासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपीठांचा बेमालूम वापर करण्याची कला मोदींना साधल्याचे भाजप समर्थक म्हणू शकतात. 'जी-२०' या समूहामध्ये द्विपक्षीय तंटे सोडवले जात नाहीत, तिथे आर्थिक विकासासाठी वेगवेगळ्या क्षेत्रांत सहकार्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. पण रशियाने युक्रेनवर युद्ध लादल्यानंतर भारतासह अनेक विकसनशील देशांच्या अर्थकारणाला जबर फटका बसला. त्यामुळे गेल्या वर्षी इंडोनेशियाच्या बालीमधील शिखर परिषदेत युक्रेनचा मुद्दा चर्चिला गेला. 'बाली जाहीरनाम्या'मध्ये अमेरिका आणि युरोपीय महासंघाने रशियावर हल्लाबोल केला. जाहीरनाम्यात 'युक्रेनविरोधातील युद्ध' असा उल्लेख जाणीवपूर्वक केला गेला, त्यासाठी विकसित देशांनी प्रचंड दबाव आणला. दिल्लीमधील शिखर परिषदेत त्याची पुनरावृत्ती होण्याची भीती होती. 'जी-२०' समूहातील मध्यम उत्पन्न गटातील देशांना रशियाशी संबंध बिघडणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. अन्नधान्य, कच्चे तेल आणि खते या अत्यंत निकडीच्या वस्तूंचा तुलनेत स्वस्तात पुरवठा होण्यासाठी या देशांना रशियाशी जुळवून घेणे भाग आहे. त्यामुळे भारत, ब्राझील, इंडोनेशिया, दक्षिण आफ्रिका आदी काही देशांनी रशियाचा अप्रत्यक्ष बचाव केला. दिल्ली जाहीरनाम्यात रशियाचा उल्लेख टाळला गेला. शिवाय 'युक्रेनविरोधातील' असा उल्लेख न करता 'युक्रेनमधील युद्ध' असा शब्दप्रयोग केला गेला. अमेरिका व युरोपीय संघावर दबाव आणून हे बदल करून घेतले गेले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# जरांगेंनी उपोषण मागे घ्यावे!

## आरक्षणाबाबत सरकार योग्य निर्णय घेईल: मुख्यमंत्री

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत ठोस निर्णय घेण्यासाठी आज मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली. या बैठकीला काही वेळापूर्वीच सुरुवात झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह विरोधी पक्ष नेते विधानसभा विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते विधानपरिषद अंबादास दानवे व विविध पक्षातील प्रमुख नेत्यांची उपस्थिती सह्याद्रीवर आहे. दीड तास चाललेल्या या बैठकीत विविध पक्षाच्या नेत्यांनी आपली भूमिका मांडली.**




### तीन अधिकारी निलंबन केले जाणार

लाठीचार्जमध्ये जे अधिकारी दोषी आहेत. त्यापैकी खाडे,आघाव अन्य एक अधिकारी यांचे निलंबन केले जाईल. जी घटना दिलगिरी व्यक्त केली. लाठीचार्जचे समर्थन कोणी करणार नाही, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत एकमत झाले. ते सुप्रीम कोर्टात थांबलेले आहे. त्याला गती देता येईल यावर चर्चा झाली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी देखील कायदेशीर बाबी मांडल्या आहेत. या बाबतीत सरकारची भूमिका स्पष्ट आहे. अन्य कोणत्याही समाजाचे आरक्षण मराठा समाजाला आरक्षण दिले जाणार नाही. त्यांना सर्वसुविधा दिल्या जातील. जो निर्णय घेऊ त्यात मराठा समाजाची फसगत होणार नाही, अशी आमची भूमिका आहे. न्यायाधीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आज बैठक झाली. जरांगे पाटील यांच्या तज्ज्ञ मंडळीला देखील जस्टिस शिंदे यांच्या समितीत घेतले जाईल. त्यांनी स्वतः यावे, किंवा अन्य लोकांनी यावे.

आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घेऊ, सरकार म्हणून मराठा आरक्षणाच्या साठी योग्य ते केले जाईल, असे मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडले. तर आमचे सरकार मराठा आरक्षणाबाबत योग्यच निर्णय घेईल, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच मनोज जरांगे यांनी उपोषण सोडावे, असा ठराव सर्वपक्षीय बैठकीतीत घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचे पडसाद राज्यभर दिसत आहेत. आज सर्वपक्षीय बैठक आयोजित केली होती. सर्वांनी उपस्थिती या ठिकाणी दाखवली. ही बैठक घेण्याचे कारण म्हणजे, जरांगे यांचे सुरु असलेले उपोषण. त्यांच्या आरोग्याची चिंता सर्वपक्षीय बैठकीच्या नेत्यांनी व्यक्त केली. राज्यात जे काही कायदा सुव्यवस्था शांतता, सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी ही बैठक होती. काही अनुचित घडले तेव्हा सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यात संवाद झालेला पाहिला आहे. त्याअनुषंगाने या चर्चेतून संवादातून व सुसंवादातून मार्ग काढायचा आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे सर्वपक्षीयांनी एक ठराव पारित केला. मनोज जरांगे पाटील यांच्या तब्येतीच्या दृष्टीने विनंती केली की, सरकार मागणीवर काम करतेय. थोडा वेळ दिला पाहिजे. त्यासाठी हे उपोषण मागे घेण्याचा ठराव पारित करुन विनंती केली. त्यामुळे जरांगे यांनी उपोषण मागे घ्यावे, अशी विनंती शासनाच्या वतीने करतो. दोन दिवसांपूर्वी जी बैठक झाली. त्यात जरांगे यांच्या शिष्टमंडळातील तज्ज्ञ देखील अतिशय सकारात्मक चर्चा झाली आहे. लाठीचार्जमध्ये जे अधिकारी दोषी आहेत. त्यापैकी खाडे,आघाव अन्य एक अधिकारी यांचे निलंबन केले जाईल. जी घटना दिलगिरी व्यक्त केली. लाठीचार्जचे समर्थन कोणी करणार नाही, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत एकमत झाले. ते सुप्रीम कोर्टात थांबलेले आहे. त्याला गती देता येईल यावर चर्चा झाली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी देखील कायदेशीर बाबी मांडल्या आहेत. या बाबतीत सरकारची भूमिका स्पष्ट आहे. अन्य कोणत्याही समाजाचे आरक्षण मराठा समाजाला आरक्षण दिले जाणार नाही. त्यांना सर्वसुविधा दिल्या जातील. जो निर्णय घेऊ त्यात मराठा समाजाची फसगत होणार नाही, अशी आमची भूमिका आहे. न्यायाधीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आज बैठक झाली. जरांगे पाटील यांच्या तज्ज्ञ मंडळीला देखील जस्टिस शिंदे यांच्या समितीत घेतले जाईल. त्यांनी स्वतः यावे, किंवा अन्य लोकांनी यावे.

# तिकडे निजाम होता इकडे नव्हता : जरांगे पाटील

## तिकडे निजाम होता इकडे निजाम नव्हता असे का म्हणता

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणासाठी गत 14 दिवसांपासून आमरण उपोषण करणारे मनोज जरांगे पाटील काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर चांगलेच संतापलेत. आम्ही त्यांचे काही घोडे मारलेत का? ते तुमच्याकडे निजाम होता, आमच्याकडे नव्हता. मराठवाड्यातील मराठ्यांना आरक्षण दिले, तर पश्चिम महाराष्ट्रातील मराठ्यांचे काय? असे ते का म्हणत आहेत.**

मी कोरडा पडायलोय बाबा, तिकडे सरकार दरबारी जोर लावा, असे ते म्हणालेत. काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी मराठा आरक्षणाविषयी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एकदम चूक निर्णय घेतला आहे. त्यांनी मराठवाड्यातील मराठा समाजाचे 2 भाग केलेत. एक म्हणजे निजामकालीन दस्तऐवज असणाऱ्यांना ओबीसीमध्ये आरक्षण देण्याचा आणि दुसरा म्हणजे दस्तऐवज नसणाऱ्यांना आरक्षण नाकारण्याचा, असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. मराठवाड्यातील मराठ्यांना आरक्षण दिले, तर पश्चिम महाराष्ट्रातील मराठ्यांनी त्यांचे काय



### जरांगे पाटील यांनी साधला निशाणा

पृथ्वीराज चव्हाण यांच्या या विधानाचा जालन्याच्या आंतरवाली सराटीत उपोषण करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी चांगलाच समाचार घेतला. ते सोमवारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले की, लेका मला तर काय बोलावे हे कळतच नाही. मी महाराष्ट्रातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळवून देण्याचे सांगत आहे. आता पश्चिम महाराष्ट्रात निजाम होता की नव्हता हे मला काय माहिती. त्यांनी 8-15 दिवस तिकडे निजाम घेऊन जायचा होता. आम्ही त्यांचे काय घोडे मारले?

घोडे मारले? तुम्ही निजामकालीन दस्तऐवज ग्राह्य धरत आहात, पण शाहू महाराजांच्या काळातील दाखले ग्राह्य धरत नाही. हा कुठला न्याय? दिल्लीत व महाराष्ट्रात भाजपचे सरकार आहे. त्यांनी हा प्रश्न प्राधान्यक्रमाणे सोडवला पाहिजे, असे चव्हाण म्हणाले. मनोज जरांगे पाटील पुढे चव्हाणांवर अधिक धारदार टीका करताना म्हणाले की, आम्ही त्यांचे काय घोडे मारले? आम्ही आरक्षण मागितले तर मागू द्या ना. आम्हीही तुमचेच आहे ना. कुणाचे एकाचे कल्याण होत असेल तर होऊ द्या. मी महाराष्ट्रातील सरसकट मराठ्याना आरक्षण देण्याचा प्रयत्न करत आहे. ते बातम्या पाहत नाही का? त्यांच्याकडे टीव्ही नाही का? मी त्यांना टीव्ही घेऊन देऊ का? मी असे बोललो की, परत म्हणतात ते असे का बोलतात. तुमच्याकडे निजाम होता. आमच्याकडे नव्हता. ते आमच्याकडे निजाम का आला नाही? तुमच्याकडे इंग्रज का आले नाही असे म्हणत आहेत. हे असे बोलणे चांगले नाही, असे जरांगे म्हणाले. मी संपूर्ण महाराष्ट्राविषयी बोलत आहे. मग पश्चिम महाराष्ट्र महाराष्ट्रात येत नाही का? मी जीव जाळतोय, मी सगळ्यांना आरक्षण देणार आहे. मी एकही विभाग सोडणार नाही.

# आपली जमीन चीनच्या ताब्यात नाही!

## » लडाखचे रस्ते मोदी सरकारने बनवले : एलजी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लडाखचे लेफ्टनंट गव्हर्नर ब्रिगेडियर (निवृत्त) बीडी मिश्रा यांनी सोमवारी (11 सप्टेंबर) सांगितले की चीनने भारताच्या एका चौरस इंच जमिनीवरही कब्जा केलेला नाही. 1962 (भारत-चीन युद्ध) मध्ये जे काही झाले त्याबद्दल बोलून काही उपयोग नाही. आज सीमेवर शेवटचा इंचही आपल्या ताब्यात आहे. देव न करो, परिस्थिती आणखी बिघडली तर लष्कराचे जवान चोख प्रत्युत्तर द्यायला तयार आहेत.**

यादरम्यान प्रसारमाध्यमांनी बीडी मिश्रा यांना राहुल गांधींच्या वक्तव्याबद्दल विचारले. प्रत्युत्तरात ते म्हणाले की, मी कोणाच्याही वक्तव्यावर भाष्य करणार नाही. मी फक्त वस्तुस्थिती सांगेन, जे मी जमिनीवर पाहिले आहे. वास्तविक, राहुल गांधी 17 ते 25 ऑगस्ट दरम्यान लडाख दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी दावा केला होता की चीनने हजारो किलोमीटर भूभागावर कब्जा केला आहे. मात्र पंतप्रधान यावर खोटे बोलले. एक इंचही जमीन गेली नसल्याचे ते सांगत आहेत.

हे पूर्ण खोटे आहे. लडाखचे लेफ्टनंट गव्हर्नर म्हणाले की, मोदी सरकारच्या काळात लष्कराचे मनोबल वाढले आहे. देशातील प्रत्येक चौरस इंच जमिनीचे संरक्षण करण्याचा त्यांचा हेतू आहे. आज आपल्या भूमीवर पाय रोवण्याच्या उद्देशाने कोणीही भारताकडे येण्याचे धाडस करू शकत नाही. 1961 साली माझी लष्करात नियुक्ती झाली. त्यावेळी माझ्या बटालियनमध्ये स्वदेशी काहीही नव्हते. आमच्या रायफल बर्मिंगहॅममध्ये बनवल्या गेल्या. आम्हाला मिळालेली घड्याळे स्वित्झर्लंडमध्ये बनवली होती. आज भारतात असे काहीही नाही जे बनत नाही. देशातील महत्त्वाच्या संस्थांमध्ये भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आपल्या लोकांना नियुक्त करत असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला. लडाखमध्ये काँग्रेस खासदार म्हणाले - केंद्रीय मंत्र्यांना त्यांच्या मंत्रालयाचे निर्णय आरएसएसच्या लोकांच्या सहकार्याने घ्यायचे आहेत. याला उत्तर देताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले – ज्या मंत्रालयांसोबत मंत्री काम करतात त्यात RSS चे सदस्य नाहीत. यापेक्षा मोठा विनोद काही असूच शकत नाही.

काँग्रेस खासदार राहुल गांधी 25 ऑगस्टपर्यंत लडाख दौऱ्यावर होते. ते शनिवारी (19 ऑगस्ट) लडाखहून पँगॉन्ग त्सो तलावाकडे दुचाकीवरून गेले होते. यावर केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी सोशल मीडियावर 2012 मध्ये काँग्रेस सरकार आणि 2023 मध्ये भाजप सरकारच्या काळात लडाखमध्ये बांधलेल्या रस्त्यांची तुलना केली.



### लष्कराचे मनोबल वाढले

» बीडी मिश्रा यांना राहुल गांधींच्या वक्तव्याबद्दल विचारले. प्रत्युत्तरात ते म्हणाले की, मी कोणाच्याही वक्तव्यावर भाष्य करणार नाही. मी फक्त वस्तुस्थिती सांगेन, जे मी जमिनीवर पाहिले आहे. वास्तविक, राहुल गांधी 17 ते 25 ऑगस्ट दरम्यान लडाख दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी दावा केला होता की चीनने हजारो किलोमीटर भूभागावर कब्जा केला आहे. मात्र पंतप्रधान यावर खोटे बोलले. एक इंचही जमीन गेली नसल्याचे ते सांगत आहेत. हे पूर्ण खोटे आहे. लडाखचे लेफ्टनंट गव्हर्नर म्हणाले की, मोदी सरकारच्या काळात लष्कराचे मनोबल वाढले आहे. देशातील प्रत्येक चौरस इंच जमिनीचे संरक्षण करण्याचा त्यांचा हेतू आहे.

# भाजप, जेडीएस एकत्र लोकसभा लढवणार!

## » 4 दिवसांपूर्वी येडियुरप्पांनीही केला होता दावा : देवेगौडा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भाजप आणि जनता दल सेक्युलर (जेडीएस) यांच्यातील युतीबाबत गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेली चर्चा आता संपुष्टात आली आहे. जेडीएस सुप्रिमो आणि माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांनी 11 सप्टेंबर रोजी सांगितले की, भाजप आणि जेडीएस एकत्र लोकसभा निवडणूक लढतील. बेंगळुरूमध्ये एका कार्यक्रमात ते म्हणाले – दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी एकत्र निवडणुका लढवण्याचे मान्य केले आहे. जेडीएस किती जागा लढवणार हे पंतप्रधान मोदींशी बोलून ठरवले जाईल.**

पक्षाचे अस्तित्व टिकवण्यासाठी निर्णय घेतल्याचे जेडीएसचे सुप्रीमो देवेगौडा म्हणाले. विरोधी पक्षांच्या युती असलेल्या I.N.D.I.A. बाबत ते म्हणाले - मी एवढा मोठा धर्मनिरपेक्ष नेता आहे, तरीही काँग्रेसने या आघाडीत सहभागी होण्यासाठी माझ्याशी संपर्कही केला नाही. 8 सप्टेंबर रोजी कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि भाजप नेते बीएस येडियुरप्पा म्हणाले होते – जेडीएस लोकसभा निवडणूक भाजपसोबत लढेल. गृहमंत्र्यांनी अमित शहा (जेडीएस) ला लोकसभेच्या 4 जागा देण्याचे मान्य केले आहे. मात्र, यापूर्वी जेडीएस कर्नाटकात २८ पैकी पाच जागांची मागणी करत होते. दुसऱ्याच दिवशी म्हणजे ९ सप्टेंबर रोजी माजी मुख्यमंत्री आणि जेडीएस नेते एचडी कुमारस्वामी यांनी भाजप नेते बीएस येडियुरप्पा यांच्यासोबतचे विधान फेटाळले. ते म्हणाले-ही येडियुरप्पा यांची वैयक्तिक प्रतिक्रिया आहे. आतापर्यंत दोन्ही पक्षांमध्ये जागावाटपावर कोणतीही चर्चा झालेली नाही. आम्ही दोन-तीन वेळा भेटलो, पण अजून निर्णय झालेला नाही. कुमारस्वामी यांनीही युतीबाबत भूमिका स्पष्ट केली. आम्ही एकत्र येतो की नाही, नंतर बघू, पण काँग्रेस राज्याची लूट करत असल्याने राज्यातील जनतेने आम्ही (दोन्ही पक्षांनी) सोबत येण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. त्यांना पर्याय हवा आहे. 2006 मध्ये मी भाजपशी हातमिळवणी केली होती. माझ्या 20 महिन्यांच्या कामामुळे राज्यात चांगली प्रतिमा (सद्भावना) आहे. 2019 च्या निवडणुकीच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास, जेडीएसला फक्त हासनचीच जागा जिंकता आली. तर मंड्या, बंगळुरू (ग्रामीण) आणि चिकबल्लापूर या जागा भाजपने जिंकल्या होत्या. माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे नातू प्रज्वल रेवन्ना यांनी हासनमधून निवडणूक जिंकली होती, मात्र त्यांची उमेदवारी कर्नाटक उच्च न्यायालयाने 1 सप्टेंबर रोजी रद्द केली होती. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी निवडणूक आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात चुकीची माहिती दिली होती, असे न्यायालयाने म्हटले होते. त्यांनी 24 कोटींहून अधिक उत्पन्न लपवले होते. 2019 च्या लोकसभा निवडणुका जिंकणारे प्रज्वल हे पक्षाचे एकमेव खासदार होते. हासन यांची खासदारकी रद्द केल्यानंतर जेडीएसकडे लोकसभेत एकही सदस्य नाही. गेल्या लोकसभा निवडणुकीत जेडीएसला 9.67% मते मिळाली होती. त्याच वेळी, जेडीएसने विधानसभा निवडणुकीत 19 जागा जिंकल्या होत्या आणि पक्षाला 13.29% मते मिळाली होती. भाजप आणि जेडीएस एकत्र आल्यास दक्षिण भारतातील या राज्यात सामाजिक आणि राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलू शकतात. कर्नाटकातील 17 टक्के लोकसंख्येचा लिंगायत समाज हा भाजपचा मूळ मतदार मानला जातो. माजी मुख्यमंत्री बीएस येडियुरप्पा हे देखील लिंगायत समाजाचे आहेत. त्याचवेळी, लिंगायत नंतर, सुमारे 15 टक्के लोकसंख्या असलेला वोक्कलिगा समुदाय दुसऱ्या क्रमांकाचा प्रभावशाली समुदाय आहे.

वोक्कालिगांना जेडीएसचे पारंपरिक मतदार मानले जाते. जेडीएस प्रमुख एचडी देवेगौडा हे स्वत: वोक्कलिगा समुदायाचे आहेत. दोन्ही पक्ष एकत्र आल्याने राज्यात एनडीएची मतसंख्या 32 टक्क्यांच्या आसपास वाढणार आहे. युती झाल्यास दोन्ही पक्ष एकमेकांना किती मते हस्तांतरित करू शकतील हा वेगळा मुद्दा असला तरी सामाजिक आणि प्रादेशिक समीकरणांच्या दृष्टीने एनडीएची जमीन भक्कम होऊ शकते.



### येडियुरप्पा यांची वैयक्तिक प्रतिक्रिया

» दुसऱ्याच दिवशी म्हणजे ९ सप्टेंबर रोजी माजी मुख्यमंत्री आणि जेडीएस नेते एचडी कुमारस्वामी यांनी भाजप नेते बीएस येडियुरप्पा यांच्यासोबतचे विधान फेटाळले. ते म्हणाले-ही येडियुरप्पा यांची वैयक्तिक प्रतिक्रिया आहे. आतापर्यंत दोन्ही पक्षांमध्ये जागावाटपावर कोणतीही चर्चा झालेली नाही. आम्ही दोन-तीन वेळा भेटलो, पण अजून निर्णय झालेला नाही. कुमारस्वामी यांनीही युतीबाबत भूमिका स्पष्ट केली. आम्ही एकत्र येतो की नाही, नंतर बघू, पण काँग्रेस राज्याची लूट करत असल्याने राज्यातील जनतेने आम्ही (दोन्ही पक्षांनी) सोबत येण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. त्यांना पर्याय हवा आहे. 2006 मध्ये मी भाजपशी हातमिळवणी केली होती.

# अल्बा बाप्टिस्टाचा झाला लाइफ पार्टनर!

कॅप्टन अमेरिका फेम अभिनेता ख्रिस इव्हान्सने त्याच्या दीर्घकाळाची मैत्रीण अल्बा बाप्टिस्टासोबत गुपचूप लग्न उरकले आहे. अमेरिकन मीडिया हाऊस पेज सिक्सनुसार, शनिवारी, 9 सप्टेंबर रोजी दोघांनी त्यांच्या घरी गुपचूप लग्न केले. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यापूर्वी एनडीएवर सर्व पाहुण्यांच्या स्वाक्षऱ्या होत्या. यासोबतच कार्यक्रमाला फोन घेऊन जाण्यास बंदी घालण्यात आली होती. बोस्टनमधील जोडप्याच्या घरी झालेल्या लग्नाला फक्त जवळचे कुटुंबातील सदस्य आणि मित्र उपस्थित होते. समोर आलेल्या काही छायाचित्रांमध्ये 42 वर्षीय ख्रिस आणि 26 वर्षीय अल्बा मार्व्हलच्या प्रसिद्ध 'ॲव्हेंजर्स' मालिकेतील काही कलाकारांसोबत बसलेले दिसत आहेत.सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटोंमध्ये ख्रिससोबत जेरेमी रेनर, रॉबर्ट डाउनी ज्युनियर आणि ख्रिस हेम्सवर्थसारखे कलाकार दिसत आहेत. हे सर्वजण स्थानिक रेस्टॉरंटमध्ये एकत्र जेवण करताना दिसले. अभिनेता ख्रिस इव्हान्स, जो 2018 मध्ये अविवाहित होता, त्याने एका मुलाखतीत सांगितले होते की तो सेटल होण्यासाठी कोणीतरी शोधत आहे. यानंतर तो अल्बाला भेटला. दोघांनी नोव्हेंबर 2022 मध्ये एकमेकांना डेट करायला सुरुवात केली. नववर्षाच्या पूर्वसंध्येला दोघांनीही एक रोमँटिक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला होता.



# पुष्पा-2 सिंघम टक्कर होईल

अल्लू अर्जुन स्टारर चित्रपट पुष्पा द: रुल पुढील वर्षी 15 ऑगस्टला प्रदर्शित होणार आहे. रिलीज डेटची घोषणा करण्यासोबतच चित्रपट निर्मात्यांनी चित्रपटाचे नवीन पोस्टरही शेअर केले आहे. हा चित्रपट 2021 मध्ये प्रदर्शित झालेल्या पुष्पा: द राइज या चित्रपटाचा सिक्वेल आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर अजय देवगण स्टारर सिंघम अगेन या चित्रपटाशी टक्कर देणार आहे. या वर्षी एप्रिलमध्ये चित्रपटाचा दिग्दर्शक रोहित शेट्टीने चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली होती. पोस्टर शेअर करताना चित्रपट निर्मात्यांनी लिहिले - पुष्पा राज पुन्हा एकदा बॉक्स ऑफिसवर विजय मिळवण्यासाठी येत आहे. चित्रपटाच्या नवीन पोस्टरमध्ये पुष्पा राजचा हात जवळून दिसत आहे. अल्लू अर्जुनचा लूक अद्याप समोर आलेला नाही. अल्लू अर्जुननेही हे पोस्टर त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केले आहे. यावेळीही फहद फाजिल आणि रश्मिका मंदान्ना या चित्रपटात दिसणार आहेत. अलीकडेच अल्लू अर्जुनला पुष्पा द: राइज या चित्रपटातील अभिनयासाठी राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला होता. याशिवाय चित्रपटाचे संगीतकार देवी श्री प्रसाद यांनाही राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुष्पा: द राइज डिसेंबर 2021 मध्ये प्रदर्शित झाला. चित्रपटाचे दिग्दर्शक सुकुमार आहेत. रश्मिका मंदान्ना, फहाद फाजिल आणि जगपती बाबू या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहेत. 'पुष्पा: द राइज' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जगभरात 332 कोटींची कमाई केली होती. या चित्रपटात चंदनाचा व्यवसाय जवळून पाहिल्यानंतर पुष्पा नावाच्या मजुराचे आयुष्य पूर्णपणे बदलून जाते.



# हा कलाकाराचा नसून कलेचा सन्मान !

लेखक, गीतकार आणि कवी जावेद अख्तर यांना लंडन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ ओरिएंटल अँड आफ्रिकन स्टडीज येथे एका समारंभात डॉक्टर ऑफ लिटरेचरची मानद पदवी प्रदान करण्यात आली आहे. या सोहळ्यात पत्नी, अभिनेत्री शबाना आझमी आणि मुलगा फरहान अख्तर यांच्यासह डॉ. अख्तरही उपस्थित होते. या समारंभात या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना जावेद अख्तर म्हणाले की, जेव्हा-जेव्हा असा पुरस्कार दिला जातो तेव्हा कलाकाराचा नव्हे तर कलेचा सन्मान होत असतो, हे विसरता कामा नये. जावेद पुढे म्हणाले, 'विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या काळात कवितेचा सन्मान का करावा असा प्रश्न अनेकांना पडतो. मी मानतो की कविता म्हणजे काय याचा विचार करणे महत्वाचे आहे? फक्त यमक कविता बनवत नाही. विरोधाभासातून चांगली कविता जन्माला येते. जावेद यांची पत्नी शबाना आझमी आणि मुलगा फरहान अख्तर यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर या कार्यक्रमाचा फोटो शेअर केला आहे.

# कठीण काळातही हसू जाऊ नये



अलीकडेच रवीना टंडनने सांगितले की, 1994 मध्ये आलेल्या मोहरा चित्रपटातील टिप-टिप बरसा पानी या गाण्याच्या शूटिंगनंतर तिला टिटॅनसचे इंजेक्शन घ्यावे लागले. गाण्याच्या शूटिंगदरम्यान ती जखमी झाल्याचे तिने सांगितले. पण, इंजेक्शन दिल्यानंतरही ती आजारी पडली. इंडियाज बेस्ट डान्सर या डान्स रिॲलिटी शोमध्ये रवीना पाहुणी म्हणून आली होती. यादरम्यान तिने सांगितले की, गाण्याच्या शूटिंगदरम्यान तिला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. फिल्मफेअरच्या रिपोर्टनुसार, शोमध्ये एका स्पर्धकाने या गाण्यावर डान्स केला. या परफॉर्मन्सनंतर रवीना म्हणाली - हे गाणे एका कन्स्ट्रक्शन साइटवर शूट करण्यात आले होते जेथे सर्वत्र खिळे पडले होते. पण, तिला अनवाणी नाचावं लागलं. रवीनाने सांगितले की, ती पडली तर तिला दुखापत होऊ नये म्हणून तिने गुडघ्याचे पॅड देखील घातले होते. मात्र असे असतानाही ती जखमी झाली आणि तिला टिटॅनसचे इंजेक्शन घ्यावे लागले. यानंतर कृत्रिम पावसात अतिशय थंड पाण्यात भिजल्याने ती आजारीही पडली. रवीना पुढे म्हणाली- तुम्ही पडद्यावर जे ग्लॅमर पाहत आहात, त्यामागे अनेक कथा दडलेल्या आहेत. रिहर्सल दरम्यान दुखापत खूप सामान्य आहे परंतु काम थांबत नाही, स्टेजवर किंवा पडद्यावर. रवीना म्हणाली की, जेव्हा तुम्ही परफॉर्म करत असता तेव्हा तुमच्या चेहऱ्यावरून हास्य आणि डान्स स्टेप्सचे भाव कधीच गायब होऊ नयेत, मग तुम्हाला कितीही वेदना होत असतील. कलाकार आणि नृत्यदिग्दर्शकांना अशा अनेक गोष्टींचा सामना करावा लागतो. रवीना टंडन

# प्रीतीची अमेरिकेत निक जोनासच्या कॉन्सर्टमध्ये हजेरी

अलीकडेच प्रीती झिंटाने निक जोनासच्या अमेरिकेतील कॉन्सर्टमध्ये हजेरी लावली होती. या कॉन्सर्टमध्ये प्रियांका चोप्रादेखील उपस्थित होती. प्रीतीने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर जोनास ब्रदर्सच्या कॉन्सर्टची व्हिडिओ क्लिपही शेअर केली आहे. यावेळी प्रियांका काळ्या रंगाच्या कट-आउट ड्रेसमध्ये होती. तिने केसही मोकळे ठेवले होते. प्रीती ब्लॅक टॉप आणि रेड चेक स्कर्टमध्ये दिसली. दोघींनी एकत्र फोटोही क्लिक केले. व्हिडिओ शेअर करताना प्रीतीने लिहिले - किती मजेदार संध्याकाळ होती आणि जोनास ब्रदर्सला ऐकण्याची उत्तम संधी होती. तिने प्रियांकालादेखील टॅग केले आणि लिहिले – उत्तम होस्ट असल्याबद्दल धन्यवाद! तिने निक जोनासलादेखील टॅग केले आणि लिहिले - तुम्ही दोघांनी खूप चांगले परफॉर्म



केले. मी तुमची चाहती झाले आहे. पुढील दौऱ्यासाठी सर्व शुभेच्छा! एका युझरने व्हिडिओवर लिहिले- प्रीती आणि प्रियांकाला एकत्र पाहणे खूप छान वाटले. तुम्ही दोघी माझ्या आवडत्या अभिनेत्री आहात. तर एका यूजरने लिहिले - तुम्ही दोघी एकमेकांच्या खऱ्या मैत्रिणी आहात. एका युझरने लिहिले- मला तुमच्या सोशल मीडियावरील पोस्ट खूप आवडतात. मला तुमची बागकाम मालिकादेखील आठवते. प्रीती झिंटाने बिझनेसमन जीन गुडइनफशी लग्न केले. त्यांना दोन मुले आहेत - जिया आणि जय. दोघांचा जन्म सरोगसीद्वारे झाला. अमेरिकेत गेल्यापासून प्रीतीने चित्रपटात काम केलेले नाही. प्रियांका लवकरच हेड ऑफ स्टेट या चित्रपटात दिसणार आहे. याशिवाय प्रीती जी ले जरा या चित्रपटातही दिसणार आहे. प्रियांका आणि प्रीतीने 2003 मध्ये द हीरो: लव्ह स्टोरी ऑफ अ स्पाय या चित्रपटात एकत्र काम केले होते. आता दोन्ही अभिनेत्री आपल्या पती आणि मुलांसह लॉस एंजेलिसमध्ये स्थायिक झाल्या आहेत.

# नोव्हाक जोकोविचने विजेतेपद पटकावले!

## » कारकिर्दीतील हे 24 वे ग्रँडस्लॅम, मेदवेदेवचा केला पराभव

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**सर्बियाच्या नोव्हाक जोकोविचने यूएस ओपन २०२३ चे विजेतेपद पटकावले आहे. अंतिम फेरीत त्याने रशियाच्या डॅनियल मेदवेदेवचा पराभव केला. जोकोविचचे हे २४ वे ग्रँडस्लॅम आणि अमेरिकेचे चौथे पुरुष एकेरीचे विजेतेपद आहे. त्याने ग्रँडस्लॅम जिंकण्याच्या बाबतीत मागरिट कोर्टची बरोबरी केली आहे. पुरुष एकेरीत 24 ग्रँडस्लॅमसह सर्वाधिक विजेतेपद पटकावणारा जोकोविच खेळाडू ठरला आहे.**

न्यूयॉर्कच्या मागरिट कोर्टवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात जोकोविचने डॅनियल मेदवेदेवचा ६-३, ७-६, ६-३ असा चुरशीच्या लढतीत पराभव केला. ३६ वर्षीय जोकोविचने पहिला सेट ६-३ असा सहज जिंकला. मेदवेदेवने दुसऱ्या सेटमध्ये पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, मात्र जोकोविचने दुसरा सेटही 7-6 असा जिंकला. तिसऱ्या सेटमध्ये ६-३ असा सहज विजय मिळवत त्याने आपले विक्रमी २४ वे ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावले. 2021 मध्ये यूएस ओपनच्या फायनलमध्ये जोकोविचला मेदवेदेवविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला होता. जोकोविचचे हे चौथे यूएस ओपन जेतेपद आहे. यापूर्वी त्याने 2011, 2015 आणि 2018 मध्ये यूएस ओपनचे विजेतेपद पटकावले होते. जोकोविचने विक्रमी ३६व्यांदा ग्रँडस्लॅमच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आणि २४ जेतेपदे जिंकली. अमेरिकेच्या युवा टेनिसपटू कोको गॉफने शनिवारी यूएस ओपनच्या अंतिम फेरीत बेलारूसच्या अरिना सबालेन्काचा पराभव करून यूएस ओपनचे विजेतेपद पटकावले. १९ वर्षीय गॉफच्या कारकिर्दीतील हे पहिले ग्रँडस्लॅम जेतेपद आहे. पहिला सेट गमावल्यानंतर गॉफने शानदार पुनरागमन करत सामना 2-6, 6-3, 6-2 असा जिंकला. हे विजेतेपद पटकावणारी गॉफ 2017 नंतरचा पहिली अमेरिकन खेळाडू ठरली आहे. हा पराक्रम सोलन स्टीफनने शेवटचा 2017 मध्ये केला होता. 1999 नंतर यूएस ओपन जिंकणारी गॉफ ही पहिली अमेरिकन किशोरवयीन खेळाडू आहे. सेरेना विल्यम्सने 1999 मध्ये ही कामगिरी केली होती.



### मेदवेदेवचा सरळ सेटमध्ये पराभव

» न्यूयॉर्कच्या मागरिट कोर्टवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात जोकोविचने डॅनियल मेदवेदेवचा ६-३, ७-६, ६-३ असा चुरशीच्या लढतीत पराभव केला. ३६ वर्षीय जोकोविचने पहिला सेट ६-३ असा सहज जिंकला. मेदवेदेवने दुसऱ्या सेटमध्ये पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, मात्र जोकोविचने दुसरा सेटही 7-6 असा जिंकला. तिसऱ्या सेटमध्ये ६-३ असा सहज विजय मिळवत त्याने आपले विक्रमी २४ वे ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावले. 2021 मध्ये यूएस ओपनच्या फायनलमध्ये जोकोविचला मेदवेदेवविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला होता.

### गॉफच्या हे पहिले ग्रँडस्लॅम

» जोकोविचचे हे चौथे यूएस ओपन जेतेपद आहे. यापूर्वी त्याने 2011, 2015 आणि 2018 मध्ये यूएस ओपनचे विजेतेपद पटकावले होते. जोकोविचने विक्रमी ३६व्यांदा ग्रँडस्लॅमच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आणि २४ जेतेपदे जिंकली. अमेरिकेच्या युवा टेनिसपटू कोको गॉफने शनिवारी यूएस ओपनच्या अंतिम फेरीत बेलारूसच्या अरिना सबालेन्काचा पराभव करून यूएस ओपनचे विजेतेपद पटकावले. १९ वर्षीय गॉफच्या कारकिर्दीतील हे पहिले ग्रँडस्लॅम जेतेपद आहे.

# विश्वचषकासाठी न्यूझीलंड संघ जाहीर!

## » दुखापतीतून पुनरागमन करणारा विल्यमसन कर्णधार

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**एकदिवसीय विश्वचषकासाठी न्यूझीलंड संघाची घोषणा करण्यात आली आहे. पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकासाठी न्यूझीलंडने सोमवारी १५ खेळाडूंची निवड केली. दुखापतीतून पुनरागमन करणाऱ्या केन विल्यमसनकडे संघाचे कर्णधारपद असेल. भारतात ५ ऑक्टोबरपासून एकदिवसीय विश्वचषकाला सुरुवात होत आहे. गतवर्षीचा उपविजेता न्यूझीलंडचा पहिला सामना गतविजेत्या इंग्लंडविरुद्ध 5 ऑक्टोबर रोजी अहमदाबाद येथे होणार आहे.**



केन विल्यमसन (कर्णधार), ट्रेंट बोल्ट, मार्क चॅपमन, डेव्हन कॉनवे, लॉकी फर्ग्युसन, मॅट हेन्री, टॉम लॅथम (उप-कर्णधार, विकेटकीपर), डॅरिल मिशेल, जिमी नीशम, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, मिशेल सँटनर, ईश सोढी, टिम साउथी आणि विल यंग. IPL 2023 च्या पहिल्या सामन्यात (31 मार्च 2023), विल्यमसन चेन्नई सुपर किंग्ज (CSK) विरुद्ध सीमारेषेवर झेल घेण्याच्या प्रयत्नात जखमी झाला. त्याच्या उजव्या गुडघ्याला दुखापत झाली.

यानंतर तो संपूर्ण लीगमधून बाहेर पडला. लीगमधून बाहेर पडल्यानंतर विल्यमसन न्यूझीलंडला परतला आणि एप्रिलमध्ये त्याच्यावर शस्त्रक्रिया झाली.

आयपीएलच्या या हंगामात तो गुजरात टायटन्स संघाचा भाग होता. ५ ऑक्टोबरपासून भारतात वर्ल्ड कप होणार आहे. सर्व संघ त्यांच्या संघात 15 खेळाडू ठेवण्यास सक्षम असतील, संघ 3 स्टँडबाय खेळाडूंची नावे देखील ठेवू शकतात. विश्वचषक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व देशांना त्यांच्या संघांची अंतिम यादी 28 सप्टेंबरपर्यंत आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला (ICC) सादर करायची आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये भारतात 46 दिवसांसाठी एकदिवसीय विश्व स्पर्धा होणार आहे, ज्यामध्ये 48 सामने खेळवले जातील.

पहिला सामना 5 ऑक्टोबर रोजी अहमदाबाद येथे गत विश्वचषकातील विजेता आणि उपविजेता इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात होणार आहे. 12 नोव्हेंबरपर्यंत लीग टप्प्यातील 45 सामने होतील.

15 आणि 16 नोव्हेंबरला दोन सेमीफायनल आणि 19 नोव्हेंबरला फायनल अहमदाबादमध्ये खेळवली जाईल. गतविजेत्या इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील लढतीने ५ ऑक्टोबरला अहमदाबाद येथून विश्वचषकाच्या चालू हंगामाची सुरुवात होणार आहे. भारतात ५ ऑक्टोबरपासून एकदिवसीय विश्वचषकाला सुरुवात होत आहे.

गतवर्षीचा उपविजेता न्यूझीलंडचा पहिला सामना गतविजेत्या इंग्लंडविरुद्ध 5 ऑक्टोबर रोजी अहमदाबाद येथे होणार आहे.

### विश्वचषकात 48 सामने खेळले जाणार

» ५ ऑक्टोबरपासून भारतात वर्ल्ड कप होणार आहे. सर्व संघ त्यांच्या संघात 15 खेळाडू ठेवण्यास सक्षम असतील, संघ 3 स्टँडबाय खेळाडूंची नावे देखील ठेवू शकतात. विश्वचषक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व देशांना त्यांच्या संघांची अंतिम यादी 28 सप्टेंबरपर्यंत आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला (ICC) सादर करायची आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये भारतात 46 दिवसांसाठी एकदिवसीय विश्व स्पर्धा होणार आहे, ज्यामध्ये 48 सामने खेळवले जातील. पहिला सामना 5 ऑक्टोबर रोजी अहमदाबाद येथे गत विश्वचषकातील विजेता आणि उपविजेता इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात होणार आहे. 12 नोव्हेंबरपर्यंत लीग टप्प्यातील 45 सामने होतील. 15 आणि 16 नोव्हेंबरला दोन सेमीफायनल आणि 19 नोव्हेंबरला फायनल अहमदाबादमध्ये खेळवली जाईल.